# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/२२१६ ३९६५ फॅक्स: २२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@merc.gov.in संकेतस्थळ: www.mercindia.org.in / www.merc.gov.in

**प्रकरण क्र. २४/२०१५** **जाहिरात क्र. १८/२०१५–१६**

## जाहीर सूचना

## विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचा (आरइन्फ्रा) पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठी अर्ज

१. मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत त्यांना मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवान्यात (सन २०११ चा पारेषण परवाना क्र १) सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. आरइन्फ्राने त्याच्या पारेषण क्षेत्रात ''खालील दोन प्रस्तावित पारेषण वाहिन्या'' समाविष्ट करण्यासाठी पारेषण परवान्यामध्ये सुधारणा करण्याची मागणी केली आहे:–

**अनु. क्र. २५. २२०केव्ही आरइन्फ्रा साकी – टीपीसी–१ पारेषण वाहिनी (१.५ किमी) आरइन्फ्रा–टी ईएचव्ही साकी उप–केंद्रापासून टीपीसी–टी ईएचव्ही साकी उप–केंद्रापर्यंत**

**अनु. क्र. २६. २२०केव्ही आरइन्फ्रा साकी – टीपीसी–२ पारेषण वाहिनी (१.५ किमी) आरइन्फ्रा–टी ईएचव्ही साकी उप–केंद्रापासून टीपीसी–टी ईएचव्ही साकी उप–केंद्रापर्यंत**

२. अर्जदाराने, अधिनियमाच्या कलम १८(२)(अ) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, त्याच्या अर्जाची सूचना (१) इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी), (२) हिंदुस्थान टाइम्स (इंग्रजी), (३) लोकसत्ता (मराठी) आणि (४) सामना (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रसिद्ध केली होती.

३. प्रसिद्ध झालेल्या सूचनेच्या अनुषंगाने, पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठीच्या अर्जाच्या संबंधात कोणत्याही सूचना आणि हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

४. राज्य पारेषण कंपनीने त्यांच्या दिनांक १० जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये, प्रस्तावित पारेषण वाहिन्या समाविष्ट करण्यासाठी, अधिनियमाच्या कलम १८ अंतर्गत, आरइन्फ्राच्या पारेषण परवान्यात सुधारणा मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

५. उपलब्ध माहिती विचारात घेतल्यावर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या, मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार, वरील परिच्छेद क्र. १ मध्ये उल्लेख केल्यानुसार प्रस्तावित पारेषण वाहिन्या समाविष्ट करण्यासाठी, आरइन्फ्राला मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवाना क्र. २०११ चा १ मध्ये सुधारणा करता येईल.

६. आयोग याद्वारे आरइन्फ्राच्या पारेषण परवान्यात करावयाच्या सुधारणेस मंजुरीसाठीच्या प्रस्तावावर खालील स्वाक्षरीकर्त्यास दिनांक २७ जानेवारी, २०१६ पर्यंत मिळू शकतील अशा रितीने जनता/हितसंबंधितांकडून सूचना/हरकती मागवीत आहे.

७. कोणत्याही व्यक्तीला रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह आयोगाच्या **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** या संकेतस्थळावर किंवा ठरवून देण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

८. मे. आरइन्फ्रा यांनी दाखल केलेल्या अर्जावर हरकती आणि अभिप्राय/सूचना दाखल करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीने आपले निवेदन इंग्रजी किंवा मराठीत, (६+१) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना व्यक्तिश: किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई–मेलद्वारा (फॅक्स:०२२–२२१६३९७६, ई–मेल: **mercindia@merc.gov.in**) पाठवावे आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई–मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. सूचना आणि/किंवा हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस सुनावणीच्यावेळी आपले म्हणणे व्यक्तिश: मांडावयाचे असल्यास त्यात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **दि. ०३ फेब्रुवारी, २०१६ रोजी ११.३० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात होणाऱ्या सुनावणीच्यावेळी**, जेव्हा मे. आरइन्फ्राच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्याबाबतचा वर उल्लेख केलेला अर्ज विचारात घेण्यात येईल तेव्हा, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल व त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

दिनांक : ३१ डिसेंबर, २०१५
ठिकाण : मुंबई

स्वाक्षरी/–
सचिव, मविनिआ